राज्यातील अंगणवाडी केंद्रांमधील भौतिक सुविधांची तपासणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र. १५३/का.६**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२६

**प्रस्तावना :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत राज्यात ११०६२५ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता व किशारेवयीन मुली यांना विविध सेवा उपलब्ध करण्यात येतात. राज्यात एकुण ४४९ ग्रामीण प्रकल्प व १०४ नागरी प्रकल्प असून त्याअंतर्गत सदर अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. सर्वसाधारणत: प्रति २५ अंगणवाडीकरिता १ बीट असून त्या स्तरावर पर्यवेक्षिका/मुख्यसेविका कार्यरत आहेत तर प्रकल्प स्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत.

अंगणवाडी केंद्रांना केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत, राज्य योजनेतंर्गत, जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, १५ वा वित्त आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था निधी इत्यादी विविध स्त्रोताद्वारे विविध प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करण्यात येतात. त्यामध्ये सोलर संच, टीव्ही, पिण्याच्या पाण्याकरिता नळ जोडणी, RO, किचन सुविधा, शौचालय, वृद्धी संनियंत्रण साधने (GMD), परसबाग इत्यादी सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. वरीलप्रमाणे अंगणवाडी केंद्रास ज्या ज्या सुविधा उपलब्ध आहेत त्याबाबतची अचूक नोंद पोषण ट्रॅकरवर असणे आवश्यक आहे. तसेच उपलब्ध करण्यात आलेल्या भौतिक सुविधांपैकी काही ठिकाणी सुविधा सुस्थितीत नसणे अथवा बंद झालेली असणे, त्याकरिता आवश्यक असणारी इतर पुरक सुविधा नसणे अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत. सबब, राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमधील भौतिक सुविधांची तपासणी (Cross Verification) करण्याची मोहिम राबविण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील सर्व अंगणवाडी केंद्रांमधील भौतिक सुविधांची तपासणी दिनांक २०.१०.२०२६ ते दिनांक २०.११.२०२६ या कालावधीत करण्यात यावी.

२. सदर तपासणीची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील:-

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत प्रकल्पाच्या अधिनस्त असलेल्या मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांचेमार्फत सदर तपासणी (Cross Verification) करण्यात यावी. त्याकरिता तपासणी सूचीचा नमूना सोबतच्या परिशिष्टानुसार राहील.

२) सदर तपासणीकरिता (Cross Verification) प्रकल्पांतर्गत एका बीटमधील मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांनी अन्य बीटमधील अंगणवाडी केंद्रांची तपासणी करावी याप्रमाणे नियोजन करावे. त्याकरिता संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी कामकाजाचे वाटप करावे.

३) ज्या प्रकल्पांतर्गत मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांची पुरेशी पदे कार्यरत नसल्यास कार्यरत मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांना एकापेक्षा अधिक बीटमधील अंगणवाडी केंद्रांच्या तपासणीचे कामकाज देण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार ग्रामीण प्रकल्पाच्या बाबतीत जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी अन्य प्रकल्पामधील मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांना अशा प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांचे तपासणीचे कामकाज द्यावे. तर नागरी प्रकल्पाच्या बाबतीत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचे मार्गदर्शनानुसार कार्यवाही करावी.

४) वरीलप्रमाणे मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांनी तपासणीची कार्यवाही दिनांक ५.११.२०२६ अखेरपर्यंत पूर्ण करावी व त्याबाबतचे आपले अहवाल संबधित प्रकल्पाच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे सादर करावेत.

५) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रत्येक बीटमधील यादृच्छिक पद्धतीने (Randomly) किमान १ अंगणवाडी केंद्रांच्या भौतिक सुविधेबाबत पडताळणी करावी व मुख्यसेविका/पर्यवेक्षिका यांनी दिलेल्या अहवालाबाबत खातरजमा करण्यात यावी. तद्नंतर प्रकल्पाचा एकत्रित अहवाल (Excel File सह) बाल विकास प्रकल्प अधिकरी यांनी ग्रामीण प्रकल्पाच्या बाबतीत जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद यांना व नागरी प्रकल्पाच्या बाबतीत विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांना दिनांक १३.११.२०२६ अखेरपर्यंत सादर करण्यात यावा. त्याचप्रमाणे सदर Cross verification नुसार अंतिम झालेल्या माहितीनुसार त्याची पोषण ट्रॅकरवर नोंद घेण्याबाबत अंगणवाडी सेविकांना सूचित करुन त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

६) त्यानुसार ग्रामीण प्रकल्पाच्या बाबतीत जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद यांनी तर नागरी प्रकल्पाच्या बाबतीत विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास) यांनी प्रत्येक प्रकल्पातील यादृच्छिक पद्धतीने (Randomly) किमान १ अंगणवाडीच्या भौतिक सुविधेच्या माहितीची पडताळणी करावी. तद्नंतर एकत्रित अहवाल (Excel File सह ) प्रमाणित करुन आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १८.११.२०२६ अखेरपर्यंत सादर करण्यात यावा.

३. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी याबाबत जिल्हानिहाय विश्लेषण करुन त्याबाबत राज्याचा एकत्रित अहवाल शासनास दिनांक २०.११.२०२६ अखेरपर्यंत सादर करण्यात यावा. तसेच वरील तपासणी मोहिमेच्या अनुषंगाने अतिरिक्त सूचना द्यावयाच्या असल्यास आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी त्याप्रमाणे सूचना निर्गमित करुन सदर कार्यवाही वेळेत पूर्ण होईल याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. सर्व स्तरावरुन माहिती संकलित होणार असल्याने त्याबाबतचा Format एकसमान राहण्याकरिता सर्व संबधितांना सूचना व मार्गदर्शन करण्यात यावे. जेणेकरुन राज्यस्तरावरुन अंगणवाडी केंद्रांमधील भौतिक सुविधांबाबतच्या माहितीचे विश्लेषण करणे सुलभ होईल.

४. सदर मोहिमेकरिता उपायुक्त(अंगणवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. राज्यात या मोहिमेमध्ये एकसुत्रीपणा राहण्याकरिता नोडल अधिकारी यांनी व त्यांचे कार्यालयातील तांत्रिक मनुष्यबळ यांनी सर्व क्षेत्रिय यंत्रणांच्या संपर्कात राहून आवश्यक ती कार्यवाही करावी.

५. अंगणवाडीमधील भौतिक सुविधांच्या तपासणीबाबतची सदर मोहिम प्रत्येक वर्षी वर्षातून दोन वेळा करण्यात यावी. त्याबाबतचे ट्रॅकिंग होण्याकरिता विभागाकडून NURTURE प्रणालीमध्ये अथवा तत्सम प्रणालीमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१६२४२२१८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.10.14 18:11:24 +05'30'

**(वि. रा. ठाकूर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा. राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,
५) सर्व जिल्हाधिकारी,
६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
७) सर्व विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास),
८) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म. व बा. वि.), जिल्हा परिषद,
९) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी / ग्रामीण),
१०) निवड नस्ती -का-६.

**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र. १५३ /का.६ सोबतचे परिशिष्ट**

## अंगणवाडी केंद्राचा तपासणी अहवाल

जिल्हा आणि तालुका -
प्रकल्पाचे नाव -
प्रकल्पाचा प्रकार- नागरी/ग्रामीण
अंगणवाडी केंद्राचे नाव व क्रमांक -
अंगणवाडी कार्यान्वित असलेले ठिकाण- स्वमालकीची इमारत/भाडे तत्वावर/ ग्रामपंचायत/ समाजमंदिर/ शाळा इमारतीमध्ये/इतर
अंगणवाडी पर्यवेक्षिकेचे नाव -
तपासणीची तारीख -

| अ.क्र. | भौतिक सुविधा | तपशील | आहे / नाही | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|---|
| १ | वीज सुविधा | वीज सुविधा आहे काय? | | |
| | | असल्यास, कायमस्वरुपी वीज जोडणी आहे अथवा सोलर संचद्वारे सुविधा आहे? | | |
| | | सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत सुरु आहे काय? | | |
| २ | TV | TV सुविधा आहे काय? | | |
| | | असल्यास, सदर सुविधा केव्हापासून आहे? | | |
| | | सदर सुविधा कोणत्या उपक्रमामधून उपलब्ध करण्यात आली आहे? (सक्षम अंगणवाडी/आदर्श अंगणवाडी /अन्य उपक्रम) | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत सुरु आहे काय? | | |
| | | अंगणवाडीमध्ये एकापेक्षा अधिक TV आहेत काय? | | |
| ३ | पाण्याची सुविधा पाईपलाईन जोडणीसह | पिण्याच्या पाण्याकरिता पाईपलाईन कनेक्शन सुविधा आहे काय? | | |
| | | असल्यास, सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | असल्यास, सदर सुविधा सुस्थितीत सुरु आहे काय? | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | RO | RO सुविधा आहे काय? | | |
| | | सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत सुरु आहे काय? | | |
| ५ | किचन सुविधा | किचन सुविधा आहे काय? | | |
| | | सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत अथवा वापरण्यायोग्य आहे? | | |
| ६ | शौचालय | शौचालय सुविधा आहे काय? | | |
| | | सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत अथवा वापरण्यायोग्य आहे काय? | | |
| ७ | वृद्धी संनियंत्रण साधने (GMD) | बालकांची शारीरिक वाढ मोजण्यासाठी सर्व प्रकारची वृद्धी संनियंत्रण साधने (GMD) उपलब्ध आहे किंवा कसे, | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत अथवा वापरण्यायोग्य आहे काय? | | |
| | | सदर साधने नादुरुस्त झाल्यानंतर त्याची दुरुस्ती अथवा नवीन उपलब्ध करुन घेण्यात आली आहेत काय? | | |
| ८ | परसबाग | परसबाग सुविधा उपलब्ध आहे काय? | | |
| | | सदर सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे? | | |
| | | सदर सुविधा सुस्थितीत आहे काय? | | |

( * सुविधा केव्हापासून उपलब्ध आहे याबाबतीत केवळ वर्ष नमूद करावे.)